# महात्मा फुले कृषी विद्यापीठ

## कृषी हवामानशास्त्र विभाग

**कृषी महाविद्यालय, पुणे ४११ ००५**

**विभाग प्रमुख : डॉ.डी.एस.पोखरकर** **फोन : २५५३८००९**


## हवामानावर आधारीत कृषि संदेश

### ग्रामीण कृषि मौसम सेवा

**सोलापूर हवामान अंदाज** **दिनांक : ०९.०१.२०१८**

**Weather based Forecast DISTRICT: SOLAPUR**

| Solapur | Rain | Tmax | Tmin | CC | RH-I | RH-II | WS | WD |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 10.01.2018 | 0 | 30 | 16 | 0 | 61 | 38 | 10 | 96 |
| 11.01.2018 | 0 | 31 | 17 | 0 | 61 | 31 | 10 | 91 |
| 12.01.2018 | 0 | 32 | 18 | 0 | 55 | 31 | 11 | 99 |
| 13.01.2018 | 0 | 33 | 18 | 1 | 67 | 29 | 11 | 112 |
| 14.01.2018 | 0 | 33 | 18 | 0 | 69 | 29 | 10 | 113 |

## हवामान अंदाजावर आधारीत कृषी सल्ला

जिल्ह्यात पुढील ५ दिवसात हवामान कोरडे राहण्याची शक्यता असून पुढील ४८ तासात किमान तापमानात फारसा बदल संभवत नाही. मागील आठवड्यातील कोरडे हवामान व या आठवड्यातील कोरडे हवामान लक्षात घेता रब्बी पिके, भाजीपाला व फळबागांना गरजेनुसार पाणी द्यावे. फळबांगाचे थंडीपासून संरक्षण करण्यासाठी फळबागांना शक्यतो सायंकाळी किंवा रात्रीचे वेळी पाणी द्यावे.

| पिक | पिक अवस्था | कृषी सल्ला |
|---|---|---|
| ऊस | लागवड | सुरु ऊसाची लागवड करण्यासाठी शेत तयार करुन सुरु ऊसाची लागवड करावी. ऊस बेणे लागणीपूर्वी १०० लिटर पाणी + ३०० मि.ली.मेलॅथिऑन + १०० ग्रॅम कार्बेन्डॅझिम (बाविस्टीन) १० मिनीटांसाठी बेणे प्रक्रिया केल्यानंतर जिवाणूंची बीज प्रक्रिया करावी. यामुळे बुरशीजन्यरोग व खवले किडीचा बंदोबस्त होतो. ॲसेटोबॅक्टर आणि स्फुरद विरघळविणारे जीवाणू खतांचे प्रमाण अनुक्रमे १० किलो आणि १.२५ किलो प्रति १०० लिटर पाण्यात मिसळून केलेल्या द्रावणात उसाच्या टिप-या ३० मिनीटे बुडवून लागण करावी. त्यामुळे नत्र खतामध्ये ५० टक्के तर स्फुरद खतामध्ये २५ टक्के बचत करता येते. |
| हरभरा | पिक वाढीची अवस्था | हरभ-यावरील घाटे अळीच्या नियंत्रणासाठी रासायनिक किटकनाशक क्लोरट्रॅनिलिप्रोल १८.५ एस.सी २.५ मिली प्रति १० लिटर किंवा इमामेक्टीन बेंझोएट ५ एस.जी ४ ग्रॅम प्रति १० लिटर हरभरा पिकावर सरासरी १ अळी प्रती झाड आढळून आल्यास पाण्यात मिसळून फवारावे. |
| ज्वारी व करडई | पिक वाढीची अवस्था | रबी ज्वारी, करडई व भाजीपाला पिकावरील मावा किडीच्या नियंत्रणासाठी २५ डब्ल्यु जी थायोमेथॉक्झाम २ ग्रॅम किंवा डायमेथोएट ३० ईसी १० मिली १० लिटर पाण्यातून फवारावे. |

| | | |
|---|---|---|
| तुर | शेंगा भरण्याची अवस्था | तुरीवरील घाटेअळीचे नियंत्रणासाठी स्पिनोसॅड ४५ एस सी २.५ मिली प्रति १० लिटर पाण्यातून किंवा इमॅमेक्टीन बेन्झोएट ५ एस जी ४ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यातून फवारावे. |
| भाजीपाला पिके | पिक वाढीची अवस्था | भाजीपाला पिकावरील रसशोषक किडींच्या नियंत्रणासाठी डायमिथोएट ३० ईसी १५ मिली किंवा लॅम्बडासाय हॅलोथ्रीन ५ ईसी ६ मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळुन फवारणी करावी.<br>गवार, टोमॅटो, मिरची, भेंडी इ. भाजीपाला पिकावर भुरी या रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे. त्यासाठी पाण्यात विरघरळणारे ८०% गंधक २ ग्रॅम प्रति लिटर या प्रमाणे फवारणी करावी. प्रादुर्भाव जास्त दिसून आल्यास डायफेनकोनॅझोल १/२ मिली + पोटॅशिअम बायकार्बोनेट ५ ग्रॅम प्रति लिटर या प्रमाणात फवारणी करावी. |
| कोबीवर्गीय पिके | पिक वाढीची अवस्था | कोबी पिकावरील मावा व फुलकोबीतील गड्डा पोखरणाऱ्या अळीच्या नियंत्रणासाठी म्यलेथिओन ५० ई . सी . २० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे किंवा ४ % निंबोळी अर्काची फवारणी करावी. |
| कांदा | पिक वाढीची अवस्था | कांदा पिकावरील फुलकिडीच्या नियंत्रणासाठी डायमेथोएट ३०% प्रवाही १५ मिली किंवा लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ५% प्रवाही ६ मिली या किटकनाशकांच्या प्रति १० लिटर पाण्यात मिसळून आलटून पालटून फवारण्या कराव्यात. |
| कापूस | पिक पक्वतेची अवस्था | पुढील हंगामात कापसावरील शेंदरी बोंड अळीचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी कापूस पिकाची वेचणी पुर्ण करावी व पिक काढून टाकावे तसेच खोडवा/फरदड किंवा दुबार पिक घेण्याचे पूर्णतः टाळावे. हंगामाबाहेर पिके घेतल्यास आर्थिक नुकसान होवून किडींना अखंड अन्न पुरवठा होतो व पुढील वर्षीच्या पिकावर किडींचा प्रादुर्भाव लवकर व जास्त प्रमाणात होतो. |
| केळी | | केळी झाडावरील करपा (सिगाटोपा) रोगाच्या नियंत्रणासाठी २५ ग्रॅम डायथेन M-45 किंवा कॉपर ऑक्झिक्लोराईड प्रति १० लि. पाण्यात मिसळुन फवारावे. |
| जनावरांचे व्यवस्थापन | | पोल्ट्रीमधील पक्षांचे थंडीपासून संरक्षण करावे.<br>शेळ्याकरिता लिव्हर फ्लूक (चपटे कृमी) जंताच्या नियंत्रणासाठी पशु वैद्यकाच्या सहाय्याने जंतनाशक पाजावे. जनावरांना रोग प्रतिबंधक उपाय म्हणून पशु वैद्यकाच्या सहाय्याने योग्य वेळी लसीकरण करून घ्यावे तसेच जनावरांना नेहमी पिण्यास स्वच्छ पाणी द्यावे. |